# THE EVILS OF INTEMPERANCE.

# दारूपासून अनर्थ.

मराठी ग्रंथ संग्रहालय

हा ग्रंथ

जनार्दन रामचंद्र

यांनीं रचिला.

मुक्काम मुंबई
गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत छापिला.

इसवी सन् १८५६

शके १७७७.

किंमत दोनआणे

मराठी ग्रंथ संग्रहालय

# अनुक्रमणिका.

पृष्ठ

प्रस्तावना ........................५

## भाग पहिला.

दारूचें सेवन केल्याने आपल्या शरीरसंपत्तीचा व सुखाचा नाश होतो ........ ........१२

## भाग दुसरा.

मद्यपानाच्या योगें करून मनुष्याचे मन, शक्ति, आणि बुद्धि निर्बळ होतात..............२२

## भाग तिसरा.

दारूच्या अमलांमध्यें पुष्कळ दुष्ट व अघोर कर्मे करण्यांत येतात..................२५

## भाग चवथा.

सुराप्राशन केल्याने मनुष्याच्या दौलतीचा आणि मिळकतीचा फार नाश होतो...........२८

लोकांस सुबोध ...................४०

# प्रस्तावना.

आलिकडे जिकडे तिकडे दारूचा प्रसार दिवसानुदिवस अतिशय वृद्धिंगत होतचालला आहे असें माझे दृष्टोत्पत्तींत आल्यामुळें मी कांहीं महिन्यामागें एका पुस्तकाच्या आधारावरून ज्ञानोदय नामक वर्तमान पत्रांत " दारूपासूनअनर्थ " या विषयावर थोडेसें लिहून त्याच्या सूज्ञ कर्त्याकडेस पाठिवलें, तें त्यानें छापण्यास योग्य आहे असें जाणून गेल्या वर्षाच्या कित्येक अंकांत लोकोपयोगार्थ छापून प्रसिद्ध केलें, याविषयीं मी त्याचा फार आभारी आहें.

परतु हा विषय तें पत्र घेणारा खेरीज करून गरीब गुरीब व मुख्यत्वेंकरून दारूच्या व्यसनांत निमग्न होऊन गेलेल्या लोकांच्या अवलोकनांत आला नसावा असें मला वाटल्या वरून मी त्यांत पुष्कळ फेरफार करून व अणखी दुसरे कित्येक नवे विचार लिहून त्यांस व इतरांस हा ग्रंथ सादर केला आहे.

आतां कोणी असें ह्मणतील कीं या विषयावर पुष्कळ लोकांनी ग्रंथ लिहिले आहेत, तर अणखी लिहिण्याचें काय प्रयोजन आहे; त्यांस माझें इतकेंच उत्तर आहे कीं ज्यामानानें दुर्गुणांची किंवा दुर्व्यसनाची वृद्धि होतजाती, तिचा विध्वंस करण्यासाठीं त्या मानानें सहस्रपट जाज्वल्य उपाय योजणें अवश्यक पडतें. वास्तविक पाहूं गेलों असतां पुरातन कालापासून आजकालपर्यंत जो हा दारुरूप प्रचंड वृक्ष माजतआला आहे, त्याचें छेदन कर-

च्छासाठीं जे उपाय या देशांत योजिले आहेत ते फारच दुर्बळ व अल्प आहेत किंबहुना कांहींच नाहींत असें ह्मटलें असतां चालेल. तर अशा वृक्षाच्या फांद्या ज्या आज सर्व पृथ्वीच्या भागांवर पसरल्या आहेत त्याचा एकाएकी समूळ नाश करणें अशक्य आहे; परंतु सर्वत्रांचा हाच-धर्महोय कीं त्यानीं ह्या वृक्षाच्या बुंधावर पुस्तकरूप कूठारानें प्रहार करीत असावे, ह्मणजे कालेकरून याचें या पृथ्वविरून निर्दलन झाल्या वांचून कदापि राहाणार नाहीं. हा विचार मनांत आणून मी हा अल्प प्रयत्न केला आहे व इतर परोपकारी लोक जे असेच प्रयत्न करितात त्यांस जगन्नियंता परमेश्वर यश देवो ह्मणजे केलेले श्रमाचें साफल्य झाल्या वांचून राहाणार नाहीं.

मी हा लाहानसा ग्रंथ रचून विद्वज्जनाचे सेवेस सादर केला आहे, त्यांतील व्यंगोक्तीकडेस त्यानीं लक्ष नदेतां सुबोध मात्र गृहण करावा अशी माझी त्यांस मनःपूर्वक विनंती आहे.

# दारूपासून अनर्थ

सांप्रतकाळीं या भरतखंडांत दारूचें व्यसन तर फारच वृद्धीतें पावलें आहे, व या नाशकारक वस्तुपासून होणारे अनर्थ व अनाहित आपले लोक गाढ निद्रावस्थेंत निमग्न होऊन गेल्यामुळें त्यांचा दृष्टोत्पत्तीस येत नाहींत; तथापि त्यांस जाग्रत अवस्थेंत आणणें, ह्या उन्मादक वस्तूचे सेवनामुळें कोणकोणते दुष्ट परिणाम उत्पन्न होतात ते दर्शिवणे, व त्यांस सुमार्गास लावणे हा मनुष्याचा स्वधर्म होय. या विषयावर तर वारंवार विद्वान् पुरुष लिहून प्रसिद्ध करीत आहेत, परंतु आमचा दुराग्रही लोकांच्या अंतःकरणावर यापासून कांहींच ठसा उठत नाहीं, हें फार सखेदाश्चर्यकारक आहे. मिशनरी ( पाद्री ) लोकांनी या वस्तूचा प्रतिबंध करण्यास अतिशय

प्रयत्न चालविले आहेत, ह्मणून वस्तुतः आपण त्यांचे फारच ऋणी आहों. त्यांनीं नुतनच दुसऱ्या परोपकारी गृहस्थांच्या सहायाने जे कोणी या विषयावर निबंध लिहितील त्यांस इनामें देऊ केल्याने पुष्कळ निबंध लोकानी लिहून कमिटी कडेस पाठविले; परंतु त्यांतून पांचमात्र इनामे देण्यास पसंत केले. ते हल्ली छापून प्रगट झाले आहेत. तर हें सर्व कशाकरितां असावें बरें! त्यांत त्यांचे स्वतांचें काय हीत आहे? कांहींच नाहीं. त्यानीं इतके परिश्रम या उद्देशाने घेतले आहेत, कीं आपण त्या विषकारक वस्तूच्या सेवनापासून दूर राहावें, ह्मणजे तेणेंकरून आमचें कल्याण होईल.

सर्व लोकांचीं शास्त्रें जरी भिन्न भिन्न आहेत, तरी दारूप्राशन करावी, असें कोणत्याहि लोकांच्या शास्त्रांत प्रसिद्धीस येईल असें दिसत नाहीं. कोणी ह्मणतील कीं थोडी दारू प्याली असतां बाधक होणार नाहीं, तर त्यांस हेंच उत्तर कीं, थोडी पितां पितां अभ्यासेंकरून अधिकाची इच्छा जडती. त्यामध्यें ही शाक्त ह्मणजे देवीउपासक आहेत, ते आपल्या देवीस प्रिय जी सुरा ती

प्राशन करितात. दारूच्या सेवनामुळें गांवांत किती अनर्थ घडत आहेत बरें? ह्मणून कित्येक सुज्ञ लोक हाका मारून व तसेच ज्ञानोदय, ज्ञान प्रकाश, प्रभाकर इत्यादि पत्रद्वारें लोकांस उपदेश करितात; तथापि हे लोक त्यांजकडेस कांहींच लक्ष देत नाहींत. हें व्यसन बहुतकरून या खंडातील लोकांस आहे असें नाहीं, तर याचा प्रसार बहुधा इतर देशांताहि पुष्कळ आहे.

ख्रिस्तीशास्त्रांत दारू विषयीं जें विरुद्ध मत दिलें आहे तें येणें प्रमाणें.

"द्राक्षारस तांबडा असतां आणि प्याल्यांत चमकतां व यथायोग्य उततां तूं पाहुनको. शेवटीं तो सर्पा सारिखा डसतो, आणि फुरशाप्रमाणें झोंबतो" ( निती अ० २३ ओ० ३१ ३२.)

प्राचीन इतिहासावरून आपणास असें कळतेंकीं, त्यावेळचे लोक आपल्या संसारसंबंधी कामांत दारूचा उपयोग करीत होते, परंतु तेहि पुनः या अम्मलकारक वस्तूचा अटकाव करण्यास पाठीमागें राहात नव्हते. याविषयीं एक उदाहरण मी एथें देतों तेणेंकरून स्पष्टपणें लक्षांत, येईल. प्राचीन काळचे स्पार्टन लोक अपल्या

मुलांना दारूपासून दूर राहावें ह्मणून जी युक्ती योजीत होते ती असी होती कीं, ते आपल्या चाकरांस पुष्कळ दारू पाजून मदोन्मत्त करीत असत; आणि जेंव्हां ते तिच्या तारेंत येऊन पशूप्रमाणें नाना तऱ्हेचीं सोंगें व मारामारी करीत, त्यावेळीं ते आपल्या मुलांस त्यांची तीं नजरेस पाडित असत. हें दाखिवण्याचें कारण ते असें समजत असतकीं, मुलांस शिक्षेच्या योगेंकरून समजविण्यापेक्षां प्रत्यक्ष दाखिवल्याने या दुष्ट व्यसनाचे परिणाम त्यांचा कोमल अंतःकरणांत पक्केपणीं ठसतील. याप्रमाणें फार दिवसापासून दारूची माहिती लोकांस आहे आणि तिचेवाईट परिणाम बंदव्हावे ह्मणून कित्येकानीं प्रयत्नहि केले. परंतु ज्या दिवसांपासून वनस्पतींतून आलकोहल ( अर्क ) काढण्याचा शोध केला, त्या दिवसापासून तर आज दिवसपर्यंत या कैफी वस्तूचा प्रसार अतिशयच वृद्धिगत होऊन गेला आहे. पृथ्वीच्या इतर भागांमध्यें आणि त्याचप्रमाणें ह्या आपल्या आबाद टापूमध्येंहि लवकरच दारूसेवन करण्याची सवई बहुतकरून तीन मुख्य कारणांवरून उत्पन्न झाली आहे. पहिलें हें कीं, लो-

कांस स्वस्त भावाने आणि फारच अल्प मेहनती-
ने ही उन्मादक वस्तु विकत घेण्यास मिळती.
दुसरें, दारू पिणारे असें समजतात, कीं बेता-
बाताने ती प्याली असतां कोणते हि प्रकारचा
अवगुण किंवा दुःख होत नाहीं. तिसरें, मजूर
दारांचा विचार असा आहे कीं ती सेवन केल्या-
ने त्यांचा थाक उतरतो.

या वरल्या तीन कारणांवरून ह्या आपल्या
देशामध्यें कैफी वस्तु अधिकाधिक लोक घेऊं लागले
आहेत; येणेंकरून नानाप्रकारचीं वाईट फलें निष्पन्न
होत चाललीं आहेत; हें यद्यपि पुष्कळांच्या दृष्टोत्प-
त्तीस येतें, तथापि आपण पाहातोंकीं याविषयीं कां-
हीं बंदोबस्त होतनाहीं. तर याचा प्रतिबंध करण्यास
कांहींतरी उपाय केला पाहिजे, हें स्वदेशीय
लोकांस अवश्य आहे. दारू पिल्याने जे अनर्थ
होतात त्यांचे या पुस्तकांत चार मुख्य विभाग के-
ले आहेत; आणि त्या दर एका भागाचे पुर्तेपणी
मी स्पष्टीकरण करतों, तें लक्षपूर्वक अवलोकन
करावें, असी माझी सर्वांस विनंती आहे.

# भाग पहिला

दारूचें सेवन केल्याने आपल्या शरीर संपत्तीचा व सुखाचा नाश होतो.

परम ज्ञानी व दयाळु परमेश्वराने आपल्या शरीराचा बांधा असा बनावलेला आहे कीं, जर आपण त्याच्या नियमाप्रमाणें वर्तलों तर आपणास या अयुष्यांत जीं अज्ञानपणाने दुःखें भोगावीं लागत आहेत तीं लागणार नाहींत, परंतु ही मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं, मनुष्यमात्र हे सर्व नियम जाणत नाहींत. कित्येक वस्तूचे गुण किंवा अवगुण हजारो वर्षांच्या अनुभवावरून समजले आहेत, त्यांवरून आपणास असें दिसतें कीं, मनुष्य मोठ्या निष्काळजीने दारू पितो तेणें करून त्याच्या शरीरांत विकृति होतात. जर आपल्या एतद्देशीय लोकांस आपण दारूच्या हिताविषयीं प्रश्न केला तर ते लागलेंच उत्तर देतात, कीं दारू सेवन केल्याने आमच्या सगळ्या दिवसाचा शीण उतरतो, आणखी तेणेंकरून आह्मास हुशारीने बोलण्याचालण्यास हि धैर्य येतें. असे अविचार किती प्रकारे खरे आहेत, त्याविषयींचे स्पष्टीकर-

ण पुढें करण्यांत येईल. दारू सेविल्याने आपल्या रुधिराभिसरणांत मोठा दोष उपस्थित होतो व त्या दोषाच्या योगें करून नाड फार उडत चालती; परंतु असा दोष रक्तास प्राप्त झाल्याने आणि नाड उडत चालल्याने, शरीरास कोणता हि फायदा उत्पन्न न होतां उलटे त्यास रोग जडतात, व जरी त्या रोगांचा अवगुण आपणास तत्क्षणीं जाणवत नाहीं, तथापि शनैः शनैः दिसण्यांत येतो. जो मनुष्य दारू पिण्याची टेव ठेवतो त्याचा मुखचंद्र कलाहीन होतो, भाषण करते वेळीं जिव्हा अटकते, नेत्रांची तेजी कमती पडून जाती, हातापायांस कंप सूटून जमिनीवर पाऊल स्थीर ठेवण्यास धैर्य होत नाहीं. त्यास काळजाचे रोग, दमा, संग्रहणी, जलोदर इत्यादि रोग भोगावे लागतात. बहुतकरून दारू अतिशय व नित्य सेवन केल्याने मनुष्य अशक्त होतो व त्याच्या मनोशक्ति क्षीणत्वातें पावून तो अल्पायुषी आणि निरुपयोगी होऊन जातो. त्याचे वर्णन एक लिबिग जर्मन देशातील माहा विद्वान् रसायण शास्त्री ह्याप्रमाणें करितो. " आज दिनपर्यंत जे शोध, प्रयोग व परिक्षा करण्यांत आले आहेत,

त्यांज वरून समजतें कीं, दारू सेविल्या नंतर त्या पिणाऱ्यांच्या घामामध्यें ती आपला दम बाहेर काढती, त्यांनच दारूची निशाणी समजती ती दुसऱ्या कोणत्याहि प्रकारें कळून येत नाहीं. त्या वरून समजतें कीं दारूचे तत्व कारबान आणि हैड्रोजन आपल्या शरीरांतल्या आक्सिसजना बरोबर मिळून कारबानिक् आसीड आणि पाणी होऊन जातें. हा आक्सिसजन, जेणें करून रसायण संयोग होतो, तो आपल्या पांढऱ्या रंगातून आला असेल; कारण रक्ताच्या अभिसरणा वांचून शरीरास आक्सिसजन घेण्यास दुसरा कोणताच मार्ग नाहीं. यावरून कळतें कीं दारू पिल्याने आपली पांढऱ्या रंगाची अमोलिक वस्तु ह्मणजे आक्सिसजन, याचा नाश होतो; परंतु जर आपण दारू न प्याली तर तो आपल्या शरीरांतल्या कोणत्याहि अंशाबरोबर मिश्र होऊन आपणास अधिक सुखकारक होईल. परंतु आक्सिसजनाच्या नाशें करून रक्त विकार होऊन मनुष्यास नाना तऱ्हेच्या व्याधी व दुःखें सहन करावीं पडतात. वैद्यशास्त्रांत पूर्ण माहिति धरणारेपुरुष अम्मल कारक वस्तु मनुष्यास विषवत् आहेत याविषयीं

त्यांचें एक मत्त आहे. प्रायशः सर्व प्रकार-चे दारूमध्यें पन्नास भागांपेक्षां जास्ती किंवा कमी कैफकारक वस्तु असती, ती जर नुस्तीच घेतली तर मनुष्याचा प्राण तत्क्षणीं जाईल. वर सांगितलेलें मत कितीप्रकारें खरें आहे, तें जाणण्यासाठीं प्रेसटून नगरचा कारोनर ( अपघाताचा चौकसनीस ) मिस्तर हेज्ञ याच्या शोधा वरून समजतें कीं १५०० मरणारांमधून ९०० मनुष्यांचें मरण दारू सेवन केल्यानें झालें होतें. आणि आतांच्या शोधावरून निरनिराळे जातींच्या दारूमध्यें अम्मलकारक वस्तु किती असती ती समजावी ह्मणून प्रोफेसर जानसन नावाच्या प्रख्यात रसायण शास्त्रज्ञाने केलेलें कोष्टक येथें उतरून घेतलें आहे. तें येणें प्रमाणें:-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रम.... | दर | १०० भागांत | ५४ | भाग | आलकोहल असतो. |
| ब्रांडी.. | " | " | ५० | पासूनतो | ५४ |
| मडेरावाइन | " | " | १८ | " | २२ |
| पोर्ट | " | " | २१ | " | २३ |
| शेरी | " | " | १५ | " | २५ |
| क्लारेट.... | " | " | ९ | " | १५ |
| च्यामूपेन.. | " | " | .५ | " | १५ |
| पोर्टर..... | " | " | ४$\frac{1}{4}$ | " | १५ |

| | | | |
|---|---|---|---|
| बीर...... | " | " | १ ३/४ |
| कडकबेवडा | " | " | ५० |

या वरील कोष्टकावरून वांचणारांची खात्री झाली असेल कीं, आपले स्वदेशीय लोक जे बीर आणि वैन ( द्राक्षारस ) यांमध्यें अम्मलकारक पदार्थ कांहींच नाहीं, असें समजून ते त्यांचा अधिक खर्च करितात, ते एक मोठे चुकींत पडतात.

डाक्तर जोनाथान परेरा नावाचा एक पुरुष वैनदारूविषयीं असें ह्मणतोकीं, "मनुष्य निरोगी असतानां त्यानें दारू प्याली तर त्यास कांहीं गुण होत नाहीं, परंतु जर तो नेहमी पिण्याची सवयीं ठेवील तर निःसंशय त्यास कांहीं दुःख झाल्या वांचून राहाणार नाहीं". डाक्तर क्रिष्टिसन असें ह्मणतो कीं, निरोगी, बलवान, आणि मेहनती मनुष्यास वैन पाजणें वाईट आहे, व ज्यास मानसिक शक्तीचे श्रम फार होतात त्यास तर ती एक मोठें दुःख उत्पन्न करणारीवस्तु होय. त्याचप्रमाणें डाक्तर कोम्ब याचें मत असें आहे कीं, "भरज्वानीमध्यें, ह्मणजे ज्यावेळीं मनुष्याच्या शरी-

[library stamp]

राचा बांधा फार चांगल्या स्थितीमध्यें असतो, शरीर दृढ दिसतें, रुधिराभिसरण फार चांगल्या रीतीने होतें, खाल्लेलें चांगलें पाचन होतें, शरीराची शक्ति चांगलें खाण्याने व बेतबात राखण्याने उत्कृष्ट राहती; त्यावेळीं जर अम्मल केला तर आपले शक्तिमध्यें क्षीणत्व येतें. जर दुर्दैवेंकरून आपणास वैन सेवन करण्याची सवई जडली तर ती एकाएकी सोडून देऊंनये, परंतु शनैःशनैः तीस कमती करावी. वृद्धपणांत ज्यावेळीं शरीराच्या सर्व शक्ति क्षीण होतात त्यावेळीं दारू परीमीत प्याल्याने ती गुण कारक होते, परंतु जेव्हां मनुष्याचा बांधा सदृढ आणि पुष्टिकारक असतो तेव्हां जर तो दारू प्राशन करतो तर माझें मत असें आहेकीं, मनुष्य आपल्या शरीर संपत्तीचा नाश स्वहस्तें करतो.

ह्यावरून असें समजूनये कीं, ज्ञात्याच्या मनुष्याने आपली शरीर संपत्ती चांगली ठेवण्यास रोज दारू पिणें अगत्याचें आहे, परंतु एवढे सांगण्याचा अर्थ असा आहेकीं, ज्याप्रमाणें आपण दुसरीं औषधें पुष्टीकरिता किंवा बरें होण्या करितां घेतों त्याच प्रमाणें जर दारूऔषधासाठी मेजाने घेतली तर त्यांत

कांहीं अवगुण होणार नाहीं. यावरून दिसतें कीं ती औषधासाठीं मात्र प्यावी, परंतु हें सांगण्यास मोठें दुःख लागतें कीं आपले लोक हें विषतुल्य पाणी मोठ्या अविचाराने व गैरसमजुतीने वापरतात. जर आपण त्यांस मित्र समजून यापासून उत्पन्न होणारे अनर्थाविषयीं निवेदन करूं लागलों तर ते चिढून ह्मणतात कीं, "दारूने आमचा सगळे दिवसाचा थाक उतरतो." ह्या उत्तरांत केवढी सत्यता आहे ती तुह्मीच पाहा. परंतु आजपर्यंत कित्येक शोध केले आहेत त्यावरून दिसतें कीं तारवटी लोक जे सर्वांपेक्षां फार मेहनत करितात त्यांचा भागवटा दारूवांचून चांगला उतरतो आणि ते आरोगी राहातात. आणखी या विषयीं एक प्रवीण डाक्तर कारपेंटर असें सांगतो कीं, "ज्यावेळीं मी बरमिंग शहरांत मेशर्स बोलटन आणि वाटसन यांचा कारखाना पाहाण्यास गेलों होतों त्यावेळीं मी तेथें एक बळवान कारागीर मोठ्या हातोड्याने त्या कारखान्यांत अतिशय उष्णतेंत सर्वांपेक्षां सक्त काम करितां पाहून विस्मित झालों. त्या कारखान्यांतल्या भट्टीची उष्णता इतकी होती कीं, ती मा-

ऱ्याने सहन करवली नाहीं. मी त्या कारीगऱ्यास पुसलें, तूं कोणत्या प्रकारची दारू पितोस कीं जेणेंकरून तूं इतका निरोगी व बळकट दिसतोस. त्याने हसून उत्तर दिलें कीं, मी कोणतीहि दारू पीत नाहीं व जेव्हां मी ती पितों तेव्हां माझें बळ इतकें कमती होतें कीं माझें काम माझ्याने बरोबर करवत नाहीं. लिड्स शहरांत ३४ मेहनती लोकांस दारू न सेवल्याने जे फायदे उत्पन्न झाले होते त्यांविषयीं ते या प्रमाणें ह्मणतात. "आह्मी खालीं सही करणार सांगतों कीं, ज्यादिवसापासून आह्मी दारू पिण्याची सवई सोडली, त्या दिवसापासून आह्मी आमचें काम अतित्वरेने आणि मनापासून करतों व आणखी आमची शरीरसंपत्ती व स्थितीहि फारच सुधारली आहे". वरील साक्षीपेक्षां अधिक अगत्याचे साक्षींत २००० वैद्य, ज्यांत सर. बि. ब्राडी, सर. जे. क्लार्क आणि दुसरे विद्वान् गृहस्थांनी एक अब्रूपत्र छापिलें आहे, त्यांत ते असा अभिप्राय दर्शिवतात कीं, मद्य व तसेच दुसऱ्या अम्मल कारक वस्तूपासून अगदी दूर राहिल्याने मनुष्याचे शरीर सं-

पत्तीत, सुखांत, आणि नीतींत वृद्धि होते.

आतां माझे स्वदेश बंधूहो, तुह्मी अंमळ विचार करा कीं, जी कांहीं वरील प्रमाणें मी आतां लिहून प्रगट केलीं आहेत, त्यांपेक्षां अधिक दृढ आणि खातरी होण्याजोगीं उदाहरणें आपल्यास थोडींच मिळतील. आपल्या लोकांमध्यें एक चाल असी आहे कीं, ज्या बायका मुलांस दूध पाजतात त्यांस पोर्ट, बीर, वगैरे कैफी व मादक पदार्थ देतात, त्याचें कारण ते असें समजतात कीं तेणेंकरून त्यांचें दूध वाढतें. परंतु हा विचार निखालस खोटा आहे. त्यानीं ह्या अम्मलकारक वस्तू पिल्याने त्यांचे दुधांत यद्यपि वृद्धि होती हें जरी निःसंशय खरें आहे तथापि ती वृद्धि कांहीं हितकारक आहे असें पाहाण्यांत येत नाहीं; कारण जसी त्यांच्या दूधांत वृद्धि होती तसी त्या दुधाच्या कसांत किंवा तत्वांत कमतीपणा होतो इतकेंच नाहीं, तर त्यांचे दूध जीं मुलें प्राशन करीतात त्यांचे शरीरसंपत्तीचा फारच नाश होतो. आणखी कितीएक स्त्रिया जेव्हां मुलें रडत असतात तेव्हां अशा विषकारक पदार्थामध्यें गोड वस्तू मिश्र करून एका बोटावर घेऊन चाटिवतात, ह्मण-

जे तें मूल त्या कैफाच्या गुंगींत थोडीशी झोंप घेतें. परंतु असें केल्याने मग त्या मुलास इजा झाल्या वांचून राहात नाहीं. तसीं मुलें मग सुस्त व गुंग होऊन जातात, त्यांचीं तोंडें सुजतात, त्यांचे डोळे येतात व पोटाच्या व दुसऱ्या रोगाने दुःख पावतात. जे पदार्थ मनुष्य खातो किंवा पितो त्यांचा गुण त्याच्या शरीरांत उत्पन्न होतो, त्याचप्रमाणें ज्या स्त्रिया आपल्या खाण्या बरोबर ह्या उन्मादक वस्तु प्राशन करितात, त्यांचा गुण त्यांच्या दुधांत येतो आणि असेंच मत पुरातन काळच्या तत्वज्ञानी लोकांचें होतें. आरीसटाटल असें सांगतो कीं "छाकल्या स्त्रियां पासून छाकटे मुलगे उत्पन्न होतात."

मुलांस दूध पाजणाऱ्या स्त्रियांनीं असें खाणें खाल्लें पाहिजे कीं ज्यांत बहुत करून दुधाची वृद्धि करणाऱ्या वस्तु असतील, जसें सागूचे तांदूळ, आरारूट वगैरे दुसऱ्या जातीची कांजी. परंतु अशा खाण्याबद्दल आपल्या स्त्रिया दारूसेवून दूध खराब करून टाकितात. डाक्तर मेकूलॉन असें सांगतो कीं, "जर कदाचित् स्त्रियांस दारूप्याल्या वांचून बरोबर दूध येत नाहीं,

तर त्यांच्या मुलांस ज्या स्त्रियांस पुष्कळ दूध असेल त्यांच्या स्वाधीन करावें". वर सांगितल्यावरून तुमची पुर्तेपणी खातरी झाली असेल कीं दारूसेवन केल्याने मनुष्याच्या शरीर संपत्तीमध्यें फार नाश होतो.

---

# भाग दुसरा

मद्यपानाच्या योगें करून मनुष्याचे मन, शक्ति, आणि बुद्धि निर्बळ होतात.

सर्व शक्तिमान् जगन्नियंत्याने मनुष्यमात्रांस बुद्धि ही एक अमूल्य देणगी दिली आहे, जिच्या योगेंकरून मनुष्य सर्व पशु पक्ष्यादिकांवर श्रेष्ठत्व भोगतो; परंतु या अमूल्य देणगीचा योग्य रीतीने उपयोग करण्याच्या बद्दल कित्येक दुष्ट मनुष्यें वाईट मार्गी तिला लावून आपल्या उत्पन्न करणारास लांछन आणितात, व त्याचा क्रोध आपणांवर पेटवितात, हें सांगण्यास फार खेद होतो.

तेंव्हां असले प्राणी परमेश्वरासमोर काय बरें उत्तर देतील ? याचा विचार वांचणारानों तुह्मीच करा. कारणें कीं छाकटे लोक जसी ती सुरा सेवन करून क्षणिक सुख भोगून मग आपल्या शरीर संपत्तीचा नाश करितात, त्याच प्रमाणें त्यांचे मन व शक्तीसहि ती निर्बळ करण्यास प्रवृत्त होते; व जें दुःख त्यांस तिजपासून जडतें तें त्यांस शेवटपर्यंत सहनकरणें प्राप्त पडतें. इंग्लंडांतील रजिस्टर जनरलच्या हिपिसाच्या रपोटावरून कळतें कीं, फार मद्यपानाची सवई ठेविल्याने त्या पिणाऱ्याच्या मस्तकांत फार वेळपर्यंत बुद्धिविभ्रम राहातो.

या दुष्टरोगाच्या तडाक्यांत विलायत देशात पुष्कळ मनुष्यें सांपडतात, परंतु अगदी थोड्यांत थोडी ह्मटलीं असतां ५०० माणसें या मस्तकाच्या रोगाने प्रतिवर्षी मरण पावतात. मद्यपान करणाराच्या ध्यानांत बहुतकरून कोणतीहि गोष्ट फार वेळपर्यंत राहात नाहीं. ही कैफकारक वस्तु सेवन केल्यानंतरें जेंव्हां त्यास पुरता अम्मल चढतो तेंव्हां तो धैर्यवान् होण्याच्या बद्दल धैर्यहीन होतो. त्याचें भान ठिकाणी राहात

नाहीं, त्याचें शाहाणपण गुंगून जातें, तो आपल्या निर्माणकर्त्यास ओंळखूं शकत नाहीं, तो काय ह्मणतो तें त्याचें त्यालाच समजत नाहीं, तो वेड, बुद्धिभ्रंश, उन्मादवायु इत्यादि दुसऱ्या रोगाधीन होतो व ते रोग शेवटीं त्याच्या जीवाचानाश केल्या वांचून त्यास सोडीत नाहींत. डाक्तर ब्रौन आपल्या प्रख्यात निबंधांत असें सांगतो कीं, "छाकटा मनुष्य आपलें शरीर व मस्तक, यांस दुर्बळ व खराब करून आपल्यावर नेहमी मस्तकशुलाचें बीजारोपण करतो. त्याचे मुलगे अशक्त, हट्टी, मूर्ख असे नी-पजतात; आणि हीं सर्व दुःखें त्या मुलांच्या आईबापांचा मूर्खपणा व गैरसमजुतीमुळें त्यांस भोगावीं लागतात. डाक्तर कारपेंटर ह्मणतो कीं मेसाच्युसेट शहराच्या राजकारभारी सभेपुढें जो रपोर्ट पाठविला होता, त्यांत ३०० वेडेमनुष्यांमधून १४५ अट्टल दारूबाजांचे मुलगे होते असें लिहिलें होतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय

# भाग तिसरा

दारूच्या अमलांमध्यें पुष्कळ दुष्ट व अघोर कर्में करण्यात येतात.

मद्यप्राशन केल्यानंतर मनुष्य पुष्कळ दुष्ट व अघोर कर्में करण्यास अटकत नाहीं. ज्याच्या शिरामध्यें ही अग्निरूप वस्तु वास करते अशा छाकट्या मनुष्यास घातकी व क्रूर कर्में करण्यास ती उत्तेजन देते; आणि त्या उत्तेजना पासून असा गुण उत्पन्न होतो कीं त्या पिलेल्या मनुष्यास चांगलें किंवा वाईट, योग्य किंवा अयोग्य, सत्य किंवा असत्य यांचा कांहीं भेद जाणण्याची शक्ति राहात नाहीं. पुष्कळ प्रतिष्ठित पुरूष जेंव्हां शुद्धिवर असतात तेंव्हां ते आपणास नम्र व शांत स्वभावाचे आणि सन्मानित असे दिसतात, परंतु तें विषतुल्य पाणी त्यांच्या गळ्यांतून एकदां खालीं उतरलें ह्मणजे त्याचा गुण त्यांस लागु होतो, आणि पहिल्याने जसे ते अब्रूवान व नम्र दिसत होते तसे ते मग बेअब्रूचे आणि उग्र प्रकृतीचे होतात. त्यांच्या मुखांतून असे अपशब्द

निघतात कीं तसे असल्या मतीच्या पुरूषांच्या मु-
खांतून निघतील असें आपले स्वर्मीहि नसतें. दारू
प्याल्याने मनुष्याच्या नीतीचा किती बिघाड होतो
व त्याच प्रमाणें त्याच्या हातून गुन्हे किती हो-
तात याविषयीं प्रख्यात न्यायाधीशांनी आपलीं
मोलवान मत्तें दिल्हीं आहेत तीं मी येथें लिहितों.
कोलरीज नामक एक न्यायाधीश असें सांगतो
कीं, “ माझ्या समोर निवाडा करण्यासाठीं जे
अपराधांचे मुकर्दमे येत त्यांतून जे खरे ठरत त्यां-
पैकीं दारूच्या कारणानें झाला नाहीं असा एक
ही नव्हता.” आलडरसन न्यायाधीश सांगतो
कीं, “ पुष्कळ अपराधांचे मुळ दारू होय, ती
जर मनुष्यें उपयोगास लावणार नाहींत तर अप-
राध्यांची जी टीप आतां एवढी मोठी चढली आहे
ती एकदम उतरेल. ” सर्वांस अवगत असेलच कीं
दारूच्या अमलांत मनुष्य एखाद्या वेळीं आपल्या
इष्ट मित्रांचे प्राण घेण्यासहि चुकत नाहीं. अ-
ज्ञानी, स्वच्छंदी, अक्षरशत्रु, अविवेकी, मूर्ख अ-
से पुष्कळ लोक मद्य प्राशन करून आपला आत्म
घात करून घेत चालले आहेत. हल्लीं थोडे म-
हिन्यामागें एक दुःखकारक व अघोर गोष्ट घडून

आली आहे, ती मी एथें लिहितों, त्यावर वाचणारांनी दृष्टी द्यावी.

मिस्तर **टामसन** या नावाचा एक प्रख्यात कुटुंबातील गृहस्थ कलकत्याचे आग्राब्यांक नामक पेढींत कारकून असे. त्याला याकैफी वस्तूंचें व्यसन लागलें होतें. तिच्या अमलांत त्यानें एके दिवसीं, आपणास जन्मवर सौख्य देणाऱ्या अशा आपल्या स्त्रीचा प्राण घेतला. मग त्याला सरकारच्या कायद्या प्रमाणें फांशीची शिक्षा झाली होती, परंतु त्या शहरच्या लोकानीं तो कुटुंबवत्सल आहे असें जाणून फांशीच्या शिक्षेपासून त्याची मुक्तता व्हावी ह्मणून तेथल्या न्यायाधीशास अर्ज केला. त्या अर्जीवर तेथल्या बहुतेक रहिवाशी लोकांच्या सह्या होत्या तेणेंकरून त्याची ती शिक्षा फिरवून त्याला काळ्या पाण्याची जन्मठेप दिली. आतां ह्या एका उदाहरणावरून वांचणारांची खातरी होईलच कीं दारू सेवन केल्याने मनुष्यांस नानाप्रकारचीं दुःखें सहन करावीं लागतात. आणखी तेणें करून तो आपल्या निर्माण कर्त्याचाहि महत् अपराधी होतो.

# भाग चवथा.

सुरा प्राशन केल्याने मनुष्याच्या दौलतीचा आणि मिळकतीचा फार नाश होतो.

ज्या पुरुषांस सुरा प्राशन करण्याची चटक लागली असते, त्यांच्या पैक्याची धूळधानी कसी होते ती त्यांस माहीत पडत नाहीं. बोर्ड आफ् ट्रेडचा सभासद मिस्तर पोर्टर यानें ब्रिटिश असोसिएशन नामक विद्यावृद्धि करणारे एका मंडळी पुढें एक अतिमोलवान कागद वांचला होता, त्यांत त्यानें महत् दुःखाने असें दर्शविलें होतें कीं इंग्लंडांतले मेहनती लोक प्रतिवर्षी केवळ दारूसाठीं पन्नास कोटी रुपये खर्चतात. आतां एवढी मोठी रकम मनुष्यें क्षणभंगुर सुखाकरितां उधळून पुढें आपल्या सकुमार बायकांस आणि कोमळ मुलांस भिक्षा मागून उदरनिर्वाह चालविण्याचें साधन करून ठेवितात, ही किती शोककारक गोष्ट होय ? त्यां स्त्रियांस आपल्या दुःखाचें आपल्या भ्रतारापासून निवारण होणे एकिकडेस रा-

हून ते घरीं येतांच त्यांस मुष्टिमोदक आणि लातांचा भडमार सोसावा लागतो. मिसर पोर्टर हा मोजदादी वरून असें सांगतो कीं, विलायते मधील मेहनती लोक आपल्या प्राप्तीमधून निमे अथवा एक तृतीयांश सुराप्राशन करण्यास खर्चतात; व जर इतकाच पैका दुसऱ्या चांगल्या मार्गाने खर्चला तर देशाच्या लाभाविषयीं आणि तसाच कुटुंबाच्या सुखाविषयीं किती प्रकारें उपयोगी पडेल, याचा वाचणारांनीच विचार करावा. या भरत खंडांत दारू पिण्यामागें जो पैका खर्च होतो तो इतका आहे कीं तेवढ्यांत कोणत्याहि जुलमी राजाचा मोठा करभार देऊन शिलक राहील इतकेंच नाहीं, तर तेणेकरून दुसरीं पुष्कळ मोठीं कामें होऊं शकतील. याच रकमेतून सर्व हिंदुस्थानांतील देशामध्यें विद्यालयें व शाळाहि स्थापल्या जातील; आणि दुसरीं प्रजेस लाभदायक असीं कामें होतील. जर कदाचित हीच रकम थोड्या वर्षांपासून जमा केली असती, तर आपल्या कंपनी सरकाराने देशाच्या सुधारणुकी साठीं पैक्याची एक मोठी रकम बक्षिस दाखल द्यावी ह्मणून वारंवार लोक अर्ज करितात, त्याचे मग

कांहींच अगत्य पडलें नसतें. आतां थोडक्यांत सांगतों कीं याच रकमेतून भुकेल्यांचे पोषण होईल, उघडे पडलेल्या लोकांची आंगें झांकतील, आणि रोगी व अपंग त्यांचीहि दाद घेतां येईल. तुह्मा सर्वांस माहीत असेलच कीं जेव्हां आपले मायाळू सरकार कोणतेंहि सुधारणुकीचें काम करण्याचा पतकर घेतें, त्यावेळीं आपले स्वदेशीय लोक कसा गवगवा करून आपला पैक्याचा हात त्या कृत्यास सहाय करण्या पासून आटोपितात. परंतु तोच दारूसाठीं खर्च करण्यास पाठी मागें हटत नाहींत; व वास्तविक विचार करून पाहिलें असतां जो दारू विषयीं खर्चलेला पैका तो पिणारांस व देशास कोणत्याहि प्रकारें हितकारक होण्याच्या बद्दल उलटा अहित कारक होतो. कितीएक लोक ह्या अम्मल कारक वस्तूचा विक्रय करून द्रव्यवान होतात, परंतु स्वदेशीय व विद्वान लोक दारू विकणारांस दुसरे धंदे व रोजगार करणाऱ्या लोकांप्रमणें प्रतिष्ठित व सन्माननीय मोजित नाहींत. तुह्मी अंमळ विचार करा कीं पिठेवाल्यापाशीं पैसा कोठून येतो ? हा पैका ते गरीब व कंगाल लोकांस विष विकून जमवितात,

तेंव्हा जर ते गरीब व लाचार मजूरदार या रीतीने आपला सर्व दिवसभर कष्टकरून संपादन केलेला पैका ह्या आगीच्या पाण्यावर खर्चण्यापेक्षां त्यानीं दुसऱ्या चांगल्या मार्गी खर्चतील तर त्यांस किती सुखदायक होईलबरें? हेलोक मजूरी करू-न आपली सर्व कमाई कलालांचे स्वाधीन करून त्यांपासून ज्या ज्ञानेकरून मनुष्य उच्चत्वास पावला आहे त्याज्ञानाचें अपहारक असें पशुतु-ल्य अज्ञान विकत घेतात, हीं किती दुःखप्रद गोष्ट आहे.

आपणास विचाराअंतीं समजतें कीं, जीं म-नुष्यें दारू पितात त्यापेक्षां जीं तिजपासून दूर राहातात तीं अधिक चांगली मेहनत करून सौ-ख्य भोगतात. तेंव्हां यावरून स्पष्ट दिसतें कीं दारूपिणारे पुरुष आपल्या शरीरसंपत्तीचा व पैसा रुक्याचा नाश स्वहस्तें करून घेतात. वा-रंवार आपले पाहाण्यांत येतें कीं ज्या गांवीं क-लालांचीं दुकानें असतात, तेथें बहुत करून द-रिद्र, दुःख तापत्रय, व अनुपपत्ति यांची समृद्धि असते.

आतां हेंवाचणारांस आश्चर्य वाटत असेल कीं, ह्या हिंदुस्थानावर असें चांगलें, न्यायी, आणि नीति सुधारणारें इंग्रेजी राज्य ह्या मादक पदार्थास प्रतिबंध नकरितां गांवांत आणूं देतें व तसेंच तिचा विक्रय करण्यास मोकळीक देतें याचें कारण काय ? काय आपले सरकारास ह्या विषतुल्य पदार्थाचे गूण माहित नाहींत कीं, तें त्याचा अटकाव नकरितां लोकांची नीति व शरीर संपत्तीचा नाश करणाऱ्या वस्तूस गावांत येऊं देऊन त्याचा फैलाव होऊंदेतें ? अथवा आपलें सरकार जाणून बूजून आपल्या रयतेवर ह्या मादक पदार्थांपासून होणारे परिणाम पाहून आनंद मानितें असें समजावेंकीं काय ? माझे स्वदेशीयहो असें कांहींच नाहीं. आपल्या सरकारास दारूपासून उत्पन्न होणाऱ्या अनिष्टांविषयीं चांगली माहिती आहे, आणि सांप्रतच्या स्थितीवरून एकाद्यास असेंहि प्रतिपादन करितां येईल कीं, सरकार जाणून आपल्या रयतेस दुःखी व दरिद्री करूं इच्छितें. सरकारास समजून उमजून दारू गावांत आणण्यास अथवा तिचा प्रसार करण्यास मोकळीक देऊन आपल्या प्रजेस हवल-

दील करण्याची गरज काय ? जर रयत मद्यदेवतेची भक्तीण होणार नाही, तर मग मारामारी, दंगे अथवा आंतल्या आंत कज्ये व द्वेष कोण करील, सरकारी कायद्यास योग्य मान कोण देईल आणि दंडाचे रुपये कोण भरील ? आपल्या सरकारास प्रतिवर्षी लक्षावधी रुपयांची प्राप्ती होते, या सबळ कारणावरून दारूची बंदी होऊं शकणार नाहीं असें दिसतें. तेव्हां प्रजेच्या नीतीचा व शरीर संपत्तीचा विध्वंस लाखोरुपयांचे लोभास्तव करण्याचें कारण काय ? ही प्राप्ती करून घेण्यास कांहीं दुसरे मार्ग नाहीत कीं काय ? अथवा शहराचे सुधारणुकीसाठीं इतकी रकम पाहिजे ती यारीतीने मिळवावी काय ? लक्षावधी रुपयांची प्राप्ती दुसरे कोणते रीतीने उत्पन्न होत नाहीं कीं, सरकारास हा मार्ग शोधून काढण्याची अगत्यता पडली आहे ? नाहीं माझे बंधुहो ! सरकाराच्या स्वाधीन दुसऱ्या पुष्कळ युक्ति आहेत, ज्यांकडून लोकांस कांहीं उपद्रव नदेतां फारच स्वल्प मेहनतीने ही मोठी रकम उत्पन्न करितां येईल.

आतां दारूचा विक्रय केल्याने जेवढी प्रा-

मी होती तेवढीच दुसऱ्या रीतीने करितां येईल, परंतु असी अल्प आयासाने होणारी प्राप्ती ती सोडली असतां कांहींवेळ पर्यंत सरकारास नानाप्रकारचीं संकटें व दुःखें सहन करावीं पडतील खरीं; परंतु जर प्रजेस त्यापासून पुढें सदोदीत अमूल्य लाभ प्राप्त होणार असले तर त्यासाठीं थोडावेळ तें त्या अडचणी व दुःखें भोगणार नाहीं कीं काय? आणि असें करण्यास आतांच्या सुधारलेल्या काळांत पूर्वींप्रमाणें मोठ्या अडचणी उलंघण्यास पडणार नाहीं. आपल्या सुज्ञ व न्यायी सरकारास मी मोठ्या नम्रतेने पुसतोंकीं ही विषाग्निरूप वस्तु, जिच्या योगें कितिएक बायांचे कमावते पुत्र, बापांचे प्रिय मुलगे, स्त्रियांचे प्रियकर भ्रतार, बहिणींचे मायाळु आणि प्राण प्रिय बंधु, गरीब लोकांचे पालन कर्ते शेटसावकार, आणि शहरांतले परोपकारी रहवासी भरज्वानीमध्यें आपला नाश करून घेतात; ती नाहींसी करूं लागले असतां कोणताहि विचारवंत व स्वदेशकल्याणेच्छु पुरुष त्या स्तुत्यकृत्यास अडथळा करणार आहे? यासाठीं सरकारास जरूर आहे कीं त्याने याचा अगदीं अटका-

व करावा. सरकारास आपल्या प्रजेसाठीं कोणकोणतीं कर्त्तव्यें आहेत ? त्याने आपल्या प्रजेस जितकें सौख्य देववेल तेवढें द्यावे, त्यांचे हक्क त्यांस वाजवी रीत्या द्यावे, त्यांच्यावर हुशारीने आणि मोठ्या धैर्याने राज्य करावें, सत्यन्याय करावा, नीतीची शिकवणूक व सांसार्गिक स्थितीची जेवढी सुधारणा होईल तेवढी करावी.

हीं सर्व वर सांगितलेलीं कर्त्तव्य कर्में प्रत्येक राज्य कर्त्यांचीं होत, आणि त्याप्रमाणें आपल्यावर राज्य चालविणाऱ्या सरकाराची हि होत. आतां असा प्रश्न उपस्थित होतो कीं, हीं सर्व कर्त्तव्य कर्में आपल्या सरकाराने कबूल केलीं आहेत की नाहींत ? याचें उत्तर मी असें देतों कीं त्यानें त्यांतून कित्येक कबूल केलीं आहेत व कित्येक अद्यापि करायाचीं आहेत.

तुह्मा सर्वांस माहीत असेलच कीं कांही महिन्या मागें एका दुकान दाराने लोकांची नीती भ्रष्ट होण्या जोगें एक चित्र विकण्यास आपल्या दुकानावर प्रसिद्धपणें टांगून ठेविलें होतें; त्यावेळीं आपल्या सरकाराने त्या दुकानदारास कायद्या प्रमाणे शिक्षा केली होती, व त्यास सांगितलें कीं,

लोकांची नीति भ्रष्ट होईल अशा प्रकारची तसबीर तुला दुकानावर प्रसिद्धपणें ठेविली न पाहिजे. आणखी सरकाराने भगीरथ प्रयत्न करून सती निघणें, गुलामगिरीचा व्यापार, बालहत्या, ठकांचा उपद्रव इत्यादि अघोर चाली निर्मूल केल्या व करण्यास झटत आहे; व तसेच खोटे शिक्के करणारांस, जुगारी लोकांस, तालीमबाजांस, व दुसरे कुमार्गांत पडलेले, त्यांस योग्य शिक्षा करतें; कारण कीं दुसऱ्या लोकांनी त्यांचीं उदाहरणें घेऊन अशा धिःक्कारयुक्त चालीपासून दूर राहावें. हें सर्व खरें आहे, परंतु जीं लेंकरें आपल्या आई बापांकडून वधिलीं गेलीं किंवा ज्या विधवा आपल्या लोकांकडून जाळिल्या गेल्या अथवा ठकलोकांकडून ज्या लोकांचा अविछिन्न नाश व नुकसानी झाली असेल, त्या सर्वां पेक्षां छाकटे लोकांकडून जे महान अनर्थ घडले गेले ते अत्यंत भयंकर आहेत.

आपले दृष्टोत्पत्तीस असें येतें कीं सरकार आपल्या रयतेचें कल्याण व्हावें व त्यांची नीती संबंधी सुधारणूक व्हावी एतदर्थ दुष्ट लोकांस शिक्षा करण्याविषयीं किती बरें काळजी वाहतें;

परंतु पुनः तेंच सरकार आपले नेत्र उघडे ठेउन दारूसारिखी विषतुल्य वस्तु गांवांत आणण्यास आणि विकण्यास मोकळीक दिल्याने लोकांच्या नीतीचा किती नाश होतो, याचा कांहींच विचार करीत नाहीं. तें गल्लो गल्ली कलालांचीं दुकानें घालण्यास मोकळीक देतें, तेणेकरून गरीब व मेहनती लोकांस विषकारक पाणी प्राशन करण्यास सोपें पडतें, व तीं पिल्याने ह्या बेटांत नीतीचा नाश व अपराधांची वृद्धि किती होते हें बहुत करून वांचणारांस माहित असेलच. सरकारच्या अनुमत्ताने कलाल दारूचीं दुकानें घालतात, हा तर सर्व सूज्ञ लोकांच्या दिसण्यांत सरकाराला मोठा कलंक आहे, आणि यावरूनच बहुत लोक ह्मणतात कीं दारूचा व्यापाराचें सरकार भागीदार आहे. तें देशाच्या कल्याणाकडे लक्ष नदेतां केवळ लाभावर नजर देऊन जेणे करून रयतेचा नाश आणि खराबी होती, अशा गोष्टी खुशीने चालू देतें.

जे लोक इंग्रेजी वर्तमान पत्रें वाचीत असतील त्यांस माहीत असेलच कीं प्रत्येक दाहा अपराधां पैकीं नऊ अपराध दारू प्याल्याने होतात;

व तसल्या अपराध्यांस कायद्याप्रमाणें शिक्षा करण्यास किती संकटें सोसावीं पडतात. ह्या (दारूचा) व्यापार चालल्याने सरकारास मोठे पोलीसखातें, तुरुंग, अदालती वगैरे यांचा खर्च अधिक वाढवावा पडतो.

यास्तव ह्या सर्व गोष्टींचा विचार करून आमच्या दयाळू सरकारानें दारूचा व्यापार समूळ बंद करावा, आणि असें झालें असतां ही गोष्ट धर्माविरुद्ध आहे असें कोणाला वाटणार नाहीं, परंतु नीति आणि सदाचरणाविषयीं सरकारची चांगली दक्षता आहे असें सर्वांस वाटेल आणि ते उलटे सरकारची प्रशंसा करूं लागतील.

## दारू पिण्याचा निषेध

### श्लोक

नकारे नका दारुचा घोट घेऊं ॥
नकारे नका आग पोटास लाऊं ॥
नकारे नका जाउं त्यांच्या दुकानीं ॥

हाकामारिती द्यावया दुष्ट पाणी ॥ १ ॥
जिरेदारूने अन्न ऐसें ह्मणोनी ॥
नकारे करूं आपुली प्राणहानी ॥
पिती ना भले सांगते काय मेले ॥
परी दारूनें शेंकडो हा.णियेले ॥ २ ॥
नकारे नका दारुला घेउंहातीं ॥
नका पीवुनीं दारुं लोकां फजीती ॥
मुलांबायकां तूमची काय आशा ॥
जरी दावितां छाकट्यानों तमाशा ॥ ३ ॥
सुरा आणि सर्पीण ह्या सारिख्याची ॥
दुजी डंखुनी प्राण घेईल हेंची ॥
सुरह्मी पित्याच्या कुळालाहि जाळी ॥
मृतांच्या मुखालाहि लाऊन काळीं ॥ ४ ॥
नकारे ह्मणूं दारूने शक्तियेते ॥
कळेना तुह्मा रांडती रक्त खाते ॥
तुह्मा वाटतें दारूने शीणजातो ॥
परी निश्चयें रोग पोटांत होतो ॥ ५ ॥
सुरागाउली वर्णिली पातकांची ॥
पितां सावली होयकैची सुखाची ॥
बळें आपुली हाण कांरे करावी ॥
सुरी खोउनी कांउरीं व्यर्थ घ्यावी ॥ ६ ॥

पितां दारूनें रोग होतो शरीरीं ॥
असें सांगती वैद्य सारे विचारीं ॥
खिळे खाउनी कोणरे सांग धाला ॥
सुरा पीउनी कोण नीरोग झाला ॥ ७ ॥
नकादारुला अंगिकारूं कदापीं ॥
बहूतां तिणें पाडिले नर्ककूपीं ॥
अफू भांग गांजा अखूती तमाखू ॥
नका कारणावीण यांसीहि चाखूं ॥ ८ ॥

ज्ञानोदय.

# लोकांस सुबोध

आतां हा माझा लहान, अल्पबुद्धीने लिहिलेला विषय संपावितेवेळीं मी बहुतकरून अमेरिकेंतील लोकांचा मोठा आभार मानतो कीं ह्या विषकारक वस्तूचे अवगुण लवकर जाणण्यास व त्यापासून उद्भवणारीं अनिष्ट फळें यांचा समूळ नाश करण्यास ते पुढें सरसावले आहेत. त्यानी

**बोस्टन** शहरांत १८२६ व्या वर्षी पहिल्याने अमलवर्जक मंडळीची स्थापना केली, व १८३८ सांत **मासाच्युसेट** व दुसरे प्रांतांत दारूची किरकोळ विक्री न करण्याचा कायदा पसार केला. अशा मंडळ्याच्या योगाने **मेन, व्हरमन्ट, र्‍होड,** तसेच दुसरे पुष्कळ **अमेरिकेंतल्या** सुधारलेल्या देशांत राज्य कारभारी सभेंतील सभासदांनी दारू व तसेच दुसरे कैफी व प्राणघातक वस्तूंचा विक्रय होऊंनये ह्मणून अटकाव केला आहे. ते लोक ह्या कायद्याची अल्पकालांत मधुर फ[illegible] चाखतील यांत किमपि संदेह नाहीं. **अमेरिकेंत** मिसिस **स्टोई** नामे एक प्रख्यात बाई व मिस्तर **बारानिस्** नामे एक विख्यात इतिहासवेत्ता, तसेच इंग्लंडांतील डाक्तर **कारपेंटर** व दुसरे कित्येक प्रख्यात वैद्यानीं ह्या अग्निरूपी पाण्यापासून शरीर संपत्ती व नीति यांचा अविछिन्न नाश व द्रव्यापव्यय व तसाच कालापव्यय किती होतो, या विषयीं स्वदेशीय लोकां पुढें आपले अमोल्य विचार प्रदर्शित केले आहेत.

आतां मी माझे स्वदेश बांधवांस त्यांचे सारखे मार्ग अवलंबण्यास मोठ्या नम्रतेने विनंति

पूर्वक सुचवितों, आणि अपेक्षा करितों कीं जगदुद्धारक त्यांस व दुसरे सर्व स्वदेशाचे अभीष्ट चिंतणारांस तद्देशिय लोकांसारखी बुद्धि देवो. ज्या अर्थी आतां तुह्मास धर्म, राज्य, नीती, देश, काल, लोक इत्यादि सर्व, दारूबंद करण्याच्या स्तुत्य कर्मास अनुकूल आहेत, त्या अर्थी अशा प्रसंगीं तुह्मी आपलीं कर्तव्य कर्मैं करण्यास मनावर घेतलें पाहिजे. जर आतां या गोष्टीची अनास्था केली तर पुढें हा मद्यपानरूपी अनर्थ मोठ्या भयंकर रीतीने वाढेल, लोकांची स्थिति असी होईल कीं ज्यांस आतां काची लंगोटी आहे ती जाऊन फटकरें व चिंधी मिळण्याची भ्रांति पडेल.

हे माझे बंधु हो ! या लाहानशा ग्रंथांत दारूपासून उत्पन्न होणारे जे अनर्थ ह्मणजे विपत्ती, दरिद्रता, व रोग हे तुह्मास वाचल्यावरून अवगत झाले असतीलच, तर निबीड अंधकारांत जे तुह्मी आज शेंकडों वर्षांपासून गाढ झोंप घेत आलां आहां त्यांतून आतां उठा, व आपलें कर्तव्य कर्म करूं लागा. तुह्मास ईश्वराने सर्व प्राणिमात्रांमध्यें श्रेष्ठ केलें असतां तुह्मी विद्यारूप

शस्त्रें घेऊन ह्या दारूरूप चोराचा शिरच्छेद करू-न त्याला पृथ्वींतून मुळींच नाहींसा करा; कारण कीं तो तुमचें कोणत्याहि प्रकारें हित न करतां उलटी तुमची नासाडी करून प्राण जी अमोल्य वस्तु त्यासहि हरण करण्यास योग्य होतो. ह्या चोराचा ज्याने अंगिकार केला तो कोठे सु-विद्या, सुकीर्ति, सत्सुख पावलेला तुमचे आढळ-ण्यांत आहे काय?

ज्या लोकांनी विद्या प्राप्त करून घेतली आहे त्यांजकडेस तरी नेत्र उघडून पाहा. ज्या विद्येच्या साहायाने कला, कौशल्यें, यंत्रें सिद्ध करून हजारो मनुष्यांचें काम एका मनुष्या कडून होऊं लागलें, एवढेंच नाहीं तर तुमचें राज्य बळकावून तुह्मास आपले अंकित करून ठेवले व निकृष्टावस्थेप्रत आणले तरी तुमचे डोळे कसेही उघडत नाहींत. अज्ञानांधकारांत तुह्मी जे अहां ते ज्ञानप्रकाशांत येऊन उभे राहा, व बुद्धिरूप काच्या कमरेस बांधून विचाररूप नौ-केंत आरोहण करून, समाधान शीड उभारून अज्ञान सागरांत जे बुचकळ्या खात आहां त्यांतू-

न पार पडण्या विषयीं प्रयत्न करा, ह्मणजे तुह्मी निःसंशय तडीस लागाल.

अहो विद्याभ्यास केलेल्या तरुणांनो तुह्मासी हि माझें बोलणे आहे. तुह्मी पुस्तकालयें काढलीं अथवा सभा काढल्या ह्मणजे तुमचें कर्तव्य कर्म तुह्मी केलें असें समजून निश्चितपणें बसूंनका. तुह्मावर एक मोठें जबाबदारीचें व अगत्याचे काम देवानें सोंपलें आहे, तें तुह्मास शेवटास नेले पाहिजे. तें हें कीं तुमचा प्रिय देश जो उत्तरोत्तर अत्यंत निकृष्टदशेप्रत पावत चालला आहे त्याचीं कारणें कोणतीं असावींत, तीं शोधून काढण्यास आधुनिक एक चित्तें निर्धार करा. त्यास पुष्कळ कारणें आहेत त्यापैकीं आपले लोक दुर्व्यसनांध होऊन गेले आहेत हें एक मुख्य होय. दारूचें व्यसन जें हल्लीं फारच बलाढ्य झालें आहे तें नाहींसें करणें तें केवळ पुस्तकालयें व सभा येणेंकरून होईल असी अपेक्षा करून स्वस्थ बसूंनका. ज्याप्रमाणें साहेबलोकांनी "टेंपरन्स सोसाईटी" ( अम्मल वर्जक सभा ) काढून तेथें दारू व दुसरे अम्मलकारक पदार्थांपासून महत दुःखें व अनुपपत्ती कसीं सहन क-

रावीं पडतात त्याविषयीं आपल्या भाषेने आपले स्वदेशीय लोकांपुढें व तुमच्या पुढें आपलें विचार प्रगट करितात, व त्यास उपायहि सुचवितात. तर त्याप्रमाणें तुह्मी आपले लोकांसाठीं जेथे प्रायः गरीब लोकांची वस्ती असेल तेथें सभा काढून स्वभाषेंत त्या लोकांसारिखीं भाषणें व बोध करा ह्मणजे दारू पासून कोणती दुःखें होतात तीं त्यांस चांगलीं माहीत पडून ते तिज पासून दूर राहातील. तसेंच जेथें आतां कलालांचीं दुकानें आहेत तेथें काफी व चाहाचीं दुकानें घाला ह्मणजे दारूबाजांचीं मनें तिकडेस वळतील. गौरी, दिवाळी, शिमगा इत्यादि सणांत तुह्मी आपल्या चाकरांस पैका देऊन दारू सेवन करण्यास उत्तेजन देतां, तें बंद करून त्याच्या बद्दल त्यांस दुर्व्यसन निषेधक बोध द्या ह्मणजे निःशंक ते तुमच्या ह्या सदुपदेशाचे मोठे आभारी होऊन तेहि आपल्या इष्ट मित्रांस त्याप्रकारचा बोध करूं लागतील. मग अर्थातच या दारुरूपी चोराचा नाश होऊन आपला देश या भूपृष्ठावर आबादानी, सुख, शांती, आरोग्यता इत्यादिकें करुन समृद्ध होण्यास जीं दुसरीं अ-

नेक साधनें आहेत तीं सुलभरीतीनें चालू हो-
तील.

माझे स्वदेशीय बंधूहो, तुह्मी परमेश्वराज-
वळ असी प्रार्थना करा कीं हे परमेश्वरा आह्मा
अनाथावर कृपेचें कांहीतरीं अवलोकन करून
ह्या आमच्या सांप्रतच्या दुःखकारक स्थितीपा-
सून आह्मास आरत होईं असें कर; व सर्व प्रकारें
तुझ्या कृपेची छाया आह्मावर असूंदे. तुह्मी
दारूचें व्यसन सोडून ईश्वराचीं कृत्यें जाणण्याचें
व्यसन लाऊनघ्या, आणि नीति, सुभक्ति, ली-
ता यांच्या पश्चात गमन करा ह्मणजे तो तुह्मास
तुमच्या सांप्रतच्या स्थितीपासून मुक्त करून, तुमचें
कल्याण करील.

समाप्त.